The Name Of Quality
Knowledge is Power
Founder : Manohar E. Patil
Reliable Academy®
ISO 9001 : 2015

# महा TEST SERIES PSI/ STI/ ASO (२०१९)

**Kalyan-Nashik-Parbhani** — **संयुक्त पूर्व सराव परिक्षा पेपर** — **Marks: 100**

**Paper No: 9** — **Test Series by : Nandini Manohar Patil** — **Time: 1 hr**

१. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्याबाबत अयोग्य विधान ओळखा.
अ) त्यांनी हिंदी, मराठी, पदरचनेतून व खंजिरीच्या खडया आवाजातून जनजागृती केली.
ब) त्यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील ‘यावली’ या गावी झाला.
क) त्यांनी सविनय कायदेभंग व चलेजाव चळवळीत भाग घेतला.
ड) त्यांचा जन्म १८०९ मध्ये झाला.

२. पुढील घटनांचा कालाक्रमानुसार योग्य क्रम असलेला पर्याय सांगा.
१) खिलाफत चळवळ
२) जालियनवाला बाग हत्याकांड
३) मॉन्टेग्यु - चेम्सफर्ड कायदा
४) रौलॅक्ट ॲक्ट
५) हंटर कमिटी
६) काळा दिन
अ) ६ – ४ – ५ – १ – २ – ३
ब) २ – ४ – ३ – ५ – ६ – १
क) ४ – ६ – ५ – २ – ३ – १
ड) ४ – ६ – २ – ५ – १ – ३

३. ‘आर्य समाजा’विषयी खालीलपैकी योग्य विधाने कोणते ते ओळखा?
१) हैद्राबाद संस्थानातील हिंदू प्रजेवरील अन्यायाकडे लक्ष वेधण्यात आर्य समाज सफल झाला.
२) आर्य समाजाने सक्तीच्या धर्मांतरास केलेल्यांना शुद्धीकरण करुन परत धर्मात घेतले.
३) जात – पात भेद व स्त्री – पुरुष भेद मान्य नव्हता.
४) तेलंगण, कर्नाटक विभागाच्या तुलनेत मराठवाडा विभागात आर्य समाज अधिक प्रभावी होता.
अ) २, ३, ४ ब) १, २, ३
क) १, २, ४ ड) वरील सर्व योग्य

४. भारत छोडो चळवळीत महाराष्ट्रातील सहभागी गावे पुढीलपैकी कोणकोणती होती ती ओळखा?
१) नंदूरबार २) सातारा
३) पुणे ४) अमरावती
अ) १, २, ३ ब) २, ३, ४
क) १, ३, ४ ड) वरील सर्व

५. खालील विधानांचा विचार बरोबर असलेले विधान निवडा.
१) जालियनवाला बाग हत्याकांड १३ एप्रिल १९१९ रोजी घडले.
२) जनरल डायरच्या आदेशाने जनतेवर गोळया झाडल्या गेल्या.
३) अनंत कान्हेर यांनी नाशिकचे कलेक्टर जॅक्सन यांची हत्या केली.
४) अनंत कान्हेर हे अभिनव भारताचे सदस्य होते. अभिनव भारताची स्थापना वि. दा. सावरकर यांनी केली.
अ) फक्त ४ बरोबर ब) फक्त १ बरोबर
क) १, २ व ३ बरोबर ड) वरील सर्व बरोबर

६. आझाद हिंद सेनेच्या अधिकाऱ्यावरील खटल्याबाबत योग्य विधाने निवडा.
१) शहानवाज खान, जगन्नाथ भोसले, कर्नल धिल्लन, लक्ष्मी स्वामीनाथन यांच्यावर खटला भरला.
२) नोव्हेंबर १९४५ मध्ये खटला दिल्लीच्या लाल किल्ल्यात चालला.
३) सर्व थरातून आरोपींना फाशीची मागणी झाली होती.
४) वकील म्हणून भूलाभाई देसाई, पं. नेहरु व तेजबहादूर सप्रु होते.
अ) १, ३, ४ ब) १, २, ३
क) १, २, ४ ड) वरील सर्व

७. खालीलपैकी योग्य जोडया ओळखा. (उठाव – नेतृत्व)
१) नाशिक – शहाआलम दुसरा
२) औरंगाबाद – फिदा अली
३) सातारा – रंगो बापुजी
४) नरगुंद – भास्करराव भावे
अ) १, २, ३ ब) २, ३, ४
क) १, ३ ड) १, २, ४

८. गोलमेज परिषदाविषयी खालीलपैकी योग्य विधान कोणते ते ओळखा?
अ) ही बैठक ब्रिटीश राजाच्या नेतृत्वाखाली लंडन येथे भरली.
ब) यामध्ये भारतातील राजकीय पक्ष प्रमुख, ब्रिटीश जनता, संस्थानिकांचे प्रतिनिधी सहभागी होते.
क) यामध्ये ब्रिटीश खासदार, संस्थानिकाचे प्रतिनिधी व भारतातील राजकीय पक्षाचे प्रतिनिधी सहभागी होते.

RELIABLE ACADEMY 9222333999

ड) यामध्ये नेहरु रिपोर्टच्या अहवालावर विचार करण्यात आला.

९. वासुदेव बळवंत फडके यांच्याविषयी अयोग्य विधान कोणते ते ओळखा?
अ) सरकारी खजिने लुटण्यावर भर दिला.
ब) समाजात समानता, ऐक्य, समन्वय निर्मितीसाठी ऐक्यवर्धिनी संस्था स्थापना.
क) त्यांच्यावर न्या. रानडे व ग. वा. जोशी यांच्या विचाराचा पगडा.
ड) उच्च न्यायालयात त्यांचे वकीलपत्र महादेव चिमाजी आपटे यांनी घेतले.

१०. ब्रिटीशांनी 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन' सोसायटीची स्थापना करुन खालीलपैकी कोणत्या ठिकाणी शाळा सुरु केली गेली?
१) मुंबई २) नाशिक
३) पुणे ४) पनवेल
अ) १, ४ ब) १, २, ३
क) १, ३, ४ ड) एकही नाही

११. खालीलपैकी अयोग्य विधाने कोणते ते ओळखा?
१) आणीबाणीची वेळ अग्रलेख – सुरेंद्रनाथ बॅनर्जी
२) कर्झनची औरंगजेबशी तुलना – दादाभाई नौरोजी
३) चिकाटीधरा, एकी राखा, स्वराज्य मिळवा – लो. टिळक
४) पंजाब प्रांत वंगभंग चळवळ प्रचार – लाला लजपतरॉय
अ) १, २, ४ ब) १, २, ३
क) २, ३, ४ ड) वरील सर्व

१२. माँटेग्यु - चेम्सफोर्ड कायद्याबाबत अयोग्य विधान कोणते ते ओळखा?
अ) या कायद्याने शिक्षण हा विषय प्रांतकडे सोपविला.
ब) या कायद्याने लंडन मध्ये भारतीय उच्चायुक्तची नेमणुक करण्यात आली.
क) या कायद्याने प्रातांना स्वायत्ता देण्यात आली.
ड) या कायद्याने भारतमंत्र्यांचा पगार लंडनच्या तिजोरीतून देण्यात आला.

१३. इ. स. १९३१ च्या कराराची अधिवेशनाबाबत योग्य विधाने कोणते ती ओळखा?
१) या अधिवेशनाचे अध्यक्ष – सरदार पटेल होते.
२) या अधिवेशनात मुलभूत हक्काचा ठराव संमत झाला.
३) या अधिवेशन काळात सविनय कायदेभंग चळवळ चालू होती.
४) या अधिवेशनात गांधी - आयर्विन काराराला संमती देण्यात आली.
अ) २, ३, ४ ब) १, २, ४
क) १, २, ३ ड) वरील सर्व

१४. कर्नाटक लढाईबद्दल खालीलपैकी योग्य विधान कोणते ते ओळखा?
अ) या लढाया इंग्रज – फ्रेंचात झालेल्या आहेत.
ब) या लढाईत इंग्रजांचा अंतिम पाडाव झाला.
क) या लढाईत फ्रेंचानी हैदरअलीची राजवट स्थापन केली.
ड) या लढाईच्या शेवटी वाँदीवाशचा करार झाला.

१५. योग्य जोडया जुळवा.

| | |
|---|---|
| १) लॉर्ड बेटींग | i) पेढाऱ्याचा बंदोबस्त |
| २) लॉर्ड हेस्टींग | ii) पुरातत्व कायदा |
| ३) लॉर्ड कर्झन | iii) ठगांचा बंदोबस्त |
| ४) लॉर्ड लिटन | iv) व्हर्नाकुलर प्रेस ॲक्ट |

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| अ) | iii | iv | ii | i |
| ब) | iv | iii | ii | i |
| क) | iii | i | ii | iv |
| ड) | i | ii | iii | iv |

१६. एक घडयाळ दर तासाला ५ मिनिट मागे पडते रविवारी सकाळी ८ वाजता घडयाळ बरोबर वेळेवर लावले तर कोणत्या दिवशी ते अचूक वेळ दाखवेल?
अ) शनिवारी संध्याकाळी ८:०० वाजता
ब) शनिवारी सकाळी ८:०० वाजता
क) रविवारी सकाळी १०:०० वाजता
ड) यापैकी नाही.

१७. खालील प्रश्न चिन्हाच्या जागी कोणता अंक येईल?




अ) २५ ब) ६४
क) १४४ ड) १६९

१८. एका सायकलच्या दुकानात काही दुचाकी व तीन चाकी सायकली आहेत. त्यांचे हॅन्डल्स मोजल्यास ४० भरतात व चाके मोजल्यास १०४ होतात, तर त्यापैकी दोन चाकी व तीन चाकी सायकली अनुक्रमे किती असेल?
अ) २४, १६ ब) १८, २२
क) २२, १८ ड) १६, २४

१९. २ बिंदू असलेल्या पृष्ठाच्या विरुद्ध बाजूस असलेल्या पृष्ठावर किती बिंदू असतील?




अ) १ ब) ५ क) ४ ड) ६

२०. **विधाने :** सर्व विमाने हे आगगाडया आहेत. काही आगगाडया खुर्च्या आहेत.
**अनुमाने :** १) काही विमाने या खुर्च्या आहेत.
२) काही खुर्च्या या विमाने आहेत.
३) काही खुर्च्या या आगगाडया आहेत.
४) काही आगगाडया विमाने आहेत.
अ) एकही योग्य नाही. ब) केवळ १ व २ बरोबर
क) केवळ २ व ३ बरोबर ड) केवळ ३ व ४ बरोबर

RELIABLE ACADEMY 9222333999

२१. एका शहराची लोकसंख्या १२००० आहे. पुरुषांच्या लोकसंख्येत प्रतिवर्षी ६% वाढ होते व स्त्रियांची लोकसंख्या प्रतिवर्षी ८% वाढते. जर पहिल्या वर्षानंतर लोकसंख्या १२८०० होत असेल तर त्या शहरात पुरुषांची संख्या किती होती?
अ) ४००० ब) ६०००
क) ८००० ड) १००००

२२. खालीलपैकी इतरांपेक्षा वेगळी असलेली आकृती कोणती ती ओळखा.



१ २ ३ ४ ५
अ) १ ब) २ क) ३ ड) ४

२३. एका मुद्रकाने एका पुस्तकावर १ पासून क्रमांक घालताना संख्येतील प्रत्येक अंकाला एक याप्रमाणे एकूण ४०२ खिळे वापरले, तर त्या पुस्तकात एकूण किती पाने असतील?
अ) १५० ब) १७०
क) १७१ ड) १७५

२४. एका विशिष्ट प्रकारच्या सांकेतिक भाषेमध्ये जर INVADER = ४२ आणि SECURE = ३० तर SITUATION = ?
अ) ६३ ब) ७२ क) ८१ ड) ९०

२५. 'अ' व 'ब' नळाने एक पाण्याची टाकी १० व २० तासात भरते परंतू 'क' नळाने ती टाकी १५ तासात रिकामी होते जर तिन्ही नळ एकाच वेळी चालू केली तर रिकामी टाकी किती तासात भरेल?
अ) ६ ब) ३ क) १२ ड) १६

२६. एक गाडी प्रवासाचा पहिला एक तृतीयांश टप्पा १० किमी प्रतितास वेगाने, दुसरा एक तृतीयांश टप्पा २० किमी प्रतितास वेगाने व शेवटचा टप्पा ६० किमी प्रतितास दराने पार करते. तर त्या गाडीच्या एकूण प्रवासाचा सरासरी वेग किती असेल?
अ) २४ किमी प्रति तास ब) १८ किमी प्रति तास
क) ३६ किमी प्रति तास ड) ४५ किमी प्रति तास

२७. शिक्षक, डॉक्टर, पुरुष



अ) ब) क) ड)

२८. रविचा जन्म ५ मे १९९२ रोजी सोमवारी झाला पहिल्या वाढदिवसापासून तो प्रत्येक वाढदिवसाला चित्रपटाला जातो. मात्र वाढदिवस मंगळवार किंवा बुधवारी आल्यास त्याला चित्रपटाला जाता येत नाही तर पहिल्या दहा वाढदिवसात तो किती वेळा चित्रपट पाहू शकणार नाही?
अ) ३ ब) ४ क) ६ ड) २

२९. एका संध्याकाळी सूर्यास्ताच्या वेळी मनिषा आणि निलिमा एकमेकांशी समोरासमोर बोलत होत्या. जर निलिमाची सावली ही बरोबर तिच्या उजव्या बाजूला पडलेली होती तर मनिषाचे तोंड कोणत्या दिशेला असेल?
अ) दक्षिण दिशा ब) पूर्व दिशा
क) पश्चिम दिशा ड) उत्तर दिशा

३०. A, B, C ची सरासरी ११ आहे. C, D, E ची सरासरी १७ आहे E व F ची सरासरी २२ आहे व E व C ची सरासरी १७ आहे तर A, B, D, E, F ची सरासरी किती?
अ) १५$\frac{2}{3}$ ब) १८$\frac{1}{2}$
क) २१$\frac{1}{3}$ ड) १६$\frac{1}{2}$

३१. खालील पर्यायातून अयोग्य विधान कोणते ते ओळखा?
अ) २१ मार्च या दिवशी दोन्ही गोलार्धात, दिवस – रात्र समसमान असतात.
ब) २१ जुन, रोजी उत्तर गोलार्धात दिवस सर्वात मोठा असतो.
क) २२ डिसेंबर रोजी दक्षिण गोलार्धात रात्र सर्वात मोठी असते.
ड) २२ डिसेंबर रोजी उत्तर गोलार्धात रात्र सर्वात मोठी असते.

३२. पृथ्वीच्या अंतरंगात जसजसे खोल जावे तसे...........
अ) दर ३२० मी. ला १°C ने तापमान वाढते.
ब) दर ३२ मी. ला १°C ने तापमान वाढते.
क) दर १६० मी. ला१°C ने तापमान कमी होते.
ड) दर १६० मी. ला १°C ने तापमान वाढते.

३३. 'खंडवहन सिंद्धाता'बाबत योग्य विधाने ओळखा?
१) हा सिद्धांत आल्फ्रेड वेगनर या ब्रिटीश शासनाने मांडला.
२) या सिद्धांतामध्ये पृथ्वीवरील जमिन – पाणी स्थिती परिवर्तनीय असल्याचे सांगितलेले आहे.
३) लॉरेशिया व गोंडवाना या भूखंडाची निर्मिती पॅन्जीया भूभापासून
४) टेथीस सागराचा तळभाग उंचावून आधुनिक व वळीच्या हिमालय पर्वताची निर्मिती
अ) १, ३, ४ ब) वरील सर्व
क) २, ३, ४ ड) १, २, ३

३४. पश्चिम वाऱ्याचा शीत प्रवाह पुढील कोणत्या महासागराच्या दक्षिण भागातून वाहतो?
१) हिंदी महासागर २) पॅसिफिक महासागर
३) अटलांटिक महासागर
अ) १, ३ ब) १, २, ३
क) २, ३ ड) १, २

३५. खालील पर्यायातून अयोग्य जोडी कोणती ती ओळखा?
१) मसाई – सॅव्हाना २) हौसा – सॅव्हाना
३) झूलू – पार्कलँड ४) मसाई - कँम्पोज
अ) १ ब) १, २, ३
क) ४ ड) यापैकी नाही

RELIABLE ACADEMY 9222333999

३६. उत्तरेकडील मध्य मैदानी प्रदेशाबाबत अयोग्य विधान ओळखा?
अ) गाळाच्या संचयनाची जाडी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाढत जाते.
ब) या प्रदेशातील हवामान सौम्य व उतारही मंद आहे.
क) वेगवान नद्यामुळे सुपीक मैदानाची निर्मिती
ड) लोकसंख्येची घनता अधिक व पायाभूत सुविधाचा विकास

३७. पावसाळ्याबाबत अयोग्य विधान ओळखा.
अ) अरबी सागरावरुन येणाऱ्या वाऱ्यामुळे भारतीय पठारी प्रदेशात पर्जन्य पडतो.
ब) अरबी सागरावरुन येणाऱ्या वाऱ्यामुळे ईशान्ये भारतात पर्जन्य पडतो.
क) बंगालच्या उपसागरावरुन येणाऱ्या वाऱ्यामुळे उ. मैदानी प्रदेशात पर्जन्य पडतो.
ड) बंगालच्या उपसागरावरुन येणाऱ्या वाऱ्यामुळे ईशान्य भारतात पर्जन्य पडतो.

३८. अयोग्य जोडीचा अचूक पर्याय निवडा.
अ) महाराष्ट्राच्या नैऋत्येला – दमणगंगा नदी
ब) महाराष्ट्राच्या वायव्येला – तोरणमाळ डोंगर
क) महाराष्ट्राच्या दक्षिणेला – हिरण्यकेशी नदी
ड) महाराष्ट्राच्या ईशान्येला – दरेकसा डोंगर

३९. गोदावरी नदीला उजव्याबाजूने क्रमाने येणाऱ्या उपनद्याचा योग्य क्रमाचा पर्याय निवडा.
अ) प्रवरा – बिंदूसरा - खाम – द. पूर्णा – प्राणहीता.
ब) मांजरा – बिंदूसरा – सिंदफणा – मुळा – दारणा
क) द. पुर्णा – पैनगंगा – वर्धा – वैनगंगा – इंद्रावती
ड) दारणा – प्रवरा – मुळा – सिंदफणा – मांजरा

४०. पूर्व किनारपट्टीवरील विशाखापट्टणम बंदराची योग्य वैशिष्टये कोणती ती ओळखा?
१) हे भारतातील प्रथम कृत्रीम बंदर आहे.
२) हे सर्वात खोल बंदर आहे.
३) हे सर्वात मोठे व्यापारी बंदर आहे.
४) हे खंडातर्गत बंदर आहे.
अ) १, २, ४ ब) १, ३, ४
क) २, ३, ४ ड) १, २, ३

४१. राष्ट्रीय राजमार्ग क्र. ६ रस्त्यावर पूर्वेकडून पश्चिमेकडे जातांना क्रमाने लागणारे शहरे कोणती ती ओळखा?
१) गोंदिया २) भंडारा ३) अकोला
४) अमरावती ५) नागपूर
अ) १, २, ३, ४, ५ ब) २, ५, ४, ३
क) ३, ४, ५, २, १ ड) १, २, ३, ४, ५

४२. योग्य जोडया लावा.

| | |
|---|---|
| १) लाकुड कारखाने | i) थळ - वायशेत (रायगड) |
| २) खत कारखाना | ii) पिंपरी (पुणे) |
| ३) औषध कारखाना | iii) बल्लारपुर (चंद्रपुर) |
| ४) रासायनिक द्रव्य कारखाना | iv) रसायनी - पनवेल (रायगड) |
| ५) शेतीची अवजारे | v)किर्लोस्करवाडी (पुणे) |
| ६) तेलशुद्धीकर केंद्र | vi) तुर्भे (नवीमुंबई) |

| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|---|
| अ) | ii | i | iv | iii | v | vi |
| ब) | iii | i | ii | iv | v | vi |
| क) | iii | i | iv | ii | v | vi |
| ड) | iii | iv | ii | i | v | vi |

४३. खालीलपैकी कोणत्या गटप्रकारातील मासे ही खोल समुद्रात पकडली जातात?
अ) हेरींग – मॅकरेल – कॅटफिश – थ्रेडफिन
ब) टुना – बानीटो – पापलेट – सारडीन
क) सारडीन – मॅकरेल – टुना
ड) पापलेट – हॅलीबॅट – बोंबील

४४. पश्चिमी वारे याबाबत खालीलपैकी कोणते विधाने योग्य आहेत ते ओळखा?
१) पश्चिमी वारे हे मध्य अंक्षाशीय जास्त दाबाच्या पट्टयाकडून ६०° अक्षवृत्तीय कमी दाबाच्या पट्टयाकडे वाहणारे वारे आहे.
२) हे वारे पश्चिमेकडून पुर्वेकडे वाहतात.
३) पृथ्वीच्या परिवलनामुळे उत्तर गोलार्धात हे वारे नैऋत्येकडून ईशान्येकडे आणि दक्षिण गोलार्धात वायव्येकडून आग्नेयेकडे वाहतात.
४) दक्षिण गोलार्धात ४०° दक्षिण या अक्षवृत्तापलीकडे हे वारे वेगाने व घोंघावत वाहतात म्हणून त्यांना तेथे गर्जणारे चाळीस असे म्हटले जाते.
५) ५०° दक्षिण अक्षवृत्ताच्या भागात हे वारे अत्यंत वेगाने वाहतात म्हणून त्यांना तेथे खवळलेले पन्नास असे म्हटले जाते.
अ) ३, ४, ५ ब) वरील सर्व
क) १, २, ४ ड) २, ३, ४, ५

४५. खालीलपैकी अयोग्य पर्याय कोणता तो ओळखा?
१) महाराष्ट्रात सर्वात जास्त तुषार सिंचन संचाची संख्या जळगांव जिल्ह्यांत आहे.
२) महाराष्ट्रात ठिंबक सिंचन पद्धतीत नाशिक जिल्हा आघाडीवर आहे.
३) महाराष्ट्रात सर्वात जास्त विहिरींची घनता सांगली व सोलापूर जिल्ह्यात आहे.
४) महाराष्ट्रात सर्वात कमी विहिरींची घनता नागपूर, अमरावती जिल्ह्यात आहे.
अ) १, २, ३ अयोग्य ब) वरील सर्व योग्य
क) फक्त १ अयोग्य ड) १, २ योग्य

४६. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशास बडतर्फ कसे केले जाते?
अ) सरन्यायाधीशांच्या बडतर्फीप्रमाणेच
ब) राज्यपाल करतात.
क) राष्ट्रपती करतात.
ड) सरन्यायाधीश करतात.

RELIABLE ACADEMY 9222333999

४७. गुवाहाटी उच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रास खालीलपैकी कोणते राज्य येत नाही?
अ) मणिपूर ब) अरुणाचल प्रदेश
क) सिक्कीम ड) आसाम

४८. पुढील विधाने विचारात घ्या?
१) उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात.
२) राष्ट्रपतीच्या अनुपस्थितीत उपराष्ट्रपती पदभार सांभाळतात.
३) राष्ट्रपती व उपराष्ट्रपती दोघेही गैरहजर असल्यास सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधिश राष्ट्रपतींची सुत्रे हाती घेतात.
अ) विधान १ व ३ बरोबर ब) सर्व बरोबर
क) विधान १ बरोबर ड) विधान १, २, ३ चूक

४९. मुंबई उच्च न्यायालयाची स्थापना कायदा कायद्याने झाली?
अ) १८६१ चा उच्च न्यायालय कायदा
ब) १८६५ चा उच्च न्यायालयाचा कायदा
क) १९०९ चा भारत सरकारचा कायदा
ड) १९११ चा कायदा

५०. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाबाबत खालीलपैकी कोणते विधान योग्य आहेत ते ओळखा?
१) ज्या उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून काम करत होते, ते उच्च न्यायालय वा न्यायालये वगळता इतर उच्च न्यायालयात अथवा सर्वोच्च न्यायालयात निवृत्तीनंतर वकीली करु शकतात.
२) ते निवृत्तीनंतर कोणत्याही न्यायालयातच वकीली करु शकत नाही.
३) ते निवृत्तीनंतर फक्त सर्वोच्च न्यायालयातच वकीली करु शकतात.
४) ते निवृत्तीनंतर फक्त कनिष्ठ न्यायालयातच वकीली करु शकतात.
अ) वरील सर्व योग्य ब) फक्त ३
क) फक्त १ ड) फक्त २

५१. खालीलपैकी कोणत्या संस्थेला घटनात्मक दर्जा नाही?
अ) राज्य लोकसेवा आयोग ब) नियोजन आयोग
क) निवडणूक आयोग ड) वित्त आयोग

५२. खालील पर्यायातून अयोग्य विधान कोणते ते ओळखा?
१) मिझोराम, नागालँड, सिक्कीम, त्रिपुरा या घटकराज्यातुन लोकसभेवर प्रत्येकी एक प्रतिनिधी निवडला जातो.
२) लोकसभेवर सर्वात जास्त प्रतिनिधी उत्तरप्रदेश मधुन निवडून दिले जातात.
३) दिल्ली या केंदशासित प्रदेशातून लोकसभेवर १३ सदस्य निवडून दिले जातात.
४) चंडिगढ या केंद्रशासित प्रदेशामधुन लोकसभेवर ३ सदस्य निवडून दिले जातात.
अ) २ व ३ ब) ३ व ४
क) वरील सर्व ड) १ व २

५३. भारतात न्यायालयीन पुनर्विलोकनात खालील बाबींचा समावेश होतो?
१) एखादा कायदा सनदशिर आहे, असे जाहिर करणे.
२) एखादा कायदा बेकायदेशीर आहे, असे जाहिर करणे.
३) पुनर्विलोकन आयोगाची स्थापना करणे.
४) घटनेच्या तरतुदींचा अर्थ लावणे.
अ) २, ३ आणि ४ ब) १, २ आणि ४
क) यापैकी नाही ड) १ आणि २

५४. खालील पर्यायातून योग्य विधाने कोणते ते ओळखा?
१) निवड झाल्यापासून जिल्हा परिषद अध्यक्ष - उपाध्यक्षाविरुद्ध सहा महिन्यांपर्यंत अविश्वासाचा ठराव मांडता येत नाही.
२) एकदा फेटाळला गेलेला अविश्वासाचा ठराव पुन्हा एका वर्षापर्यंत मांडता येत नाही.
३) महिला अध्यक्ष असतील तर त्यांच्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव संमत होण्यासाठी ३/४ बहुमताची गरज असते.
अ) २, ३ ब) १, २, ३
क) यापैकी नाही ड) १, ३

५५. खालील पर्यायातून अयोग्य विधान कोणते ते ओळखा?
१) ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार पंचायतराजला घटनात्मक दर्जा देण्यात आला.
२)भारतीय संविधानाच्या भाग ९ (क) मध्ये पंचायतराजची तरतुद करण्यात आली आहे.
३) ७३ व्या घटनादुरुस्तीची विधेयकावर राष्ट्रपतीने २० एप्रिल १९९३ रोजी स्वाक्षरी केली.
४) ७३ व्या घटनादुरुस्तीची अंमलबजावणी २४ एप्रिल १९९३ पासून झाली.
अ) १, २, ३ ब) फक्त २
क) यापैकी नाही ड) १, २

५६. योग्य जोडया जुळवा.
१) भाग १ i) मुलभूत हक्क
२) भाग ३ ii) पंचायती राज
३) भाग ९ iii) नागरिकत्व
४) भाग २ iv) केंद्र आणि प्रदेश

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| अ) | iv | i | iii | ii |
| ब) | i | ii | iv | iii |
| क) | iv | i | ii | iii |
| ड) | i | ii | iii | iv |

५७. सरपंच किंवा उपसरपंच निवडीसंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध कोणाकडे दाद मागता येते?
अ) मुख्य कार्यकारी अधिकारी ब) राज्यशासन
क) स्थायी समिती ड) विभागीय आयुक्त

५८. तालुका स्तरावर रोजगार हमी योजनेचा प्रमुख म्हणून कोण काम पाहतो?
अ) गटविकास अधिकारी ब) तहसिलदार
क) पंचायत समिती सभापती ड) वरीलपैकी नाही.

RELIABLE ACADEMY 9222333999

५९. खालीलपैकी घटनेत नमूद असलेले मुलभूत कर्तव्य ओळखा?
अ) राष्ट्रीय नेत्यांचा मान राखणे.
ब) वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्वीकार करणे.
क) निरक्षरता दूर करणे.
ड) हुंडापद्धती बंद करणे.

६०. भारताच्या राष्ट्रपतींच्या हाती कोणते अधिकार असतात?
अ) कोणतेच अधिकार नसतात.
ब) नामधारी अधिकार
क) नियंत्रित पण वास्तव अधिकार
ड) सर्वोच्च, निरंकुश अधिकार

६१. जर एखाद्या वस्तुची जागा बदलायची असेल किंवा ती गतिमान करायची असेल तर त्या वस्तुवर कोणते बल लावावे लागते?
अ) संतुलित बदल ब) असंतुलित बल
क) घर्षणबल ड) प्रतिक्रिया बल

६२. अल्कोहोलमध्ये द्रावणीय आहे असा घटक खालीलपैकी कोणता तो ओळखा?
अ) अमोनियम हायड्रॉक्साईड
ब) सोडिअम हायड्रॉक्साईड
क) पोटॅशिअम हायड्रॉक्साईड
ड) वरीलपैकी एकही नाही.

६३. खालीलपैकी चूक नसलेले विधान कोणते ते ओळखा?
१) वनस्पतीच्या वाढीला कालमर्यादा नसते, कारण त्या जिवंत असेपर्यंत वाढतात.
२) प्राण्यांची वाढ सतत होत राहते.
३) माणसांची वाढ १८ ते २५ वर्षांपर्यंत होते.
४) प्राण्यांची वाढ ठराविक काळापर्यंत होत असते.
अ) १, २, ३ ब) २, ४, ३
क) १, ३, ४ ड) वरीलपैकी सर्व

६४. खालील काही पदार्थ व त्यात असणाऱ्या आम्लाच्या जोडया दिल्या आहेत. त्यापैकी अयोग्य जोडी कोणती ती ओळखा?
१) टोमॅटो - ऑक्सलिक आम्ल
२) दही - लॅक्टीक आम्ल
३) लिंबू - सायट्रीक आम्ल
४) मधमाशीचा चावा - फॉरमीक आम्ल
५) वॅलेरम वनस्पती - ॲसेटीक ॲसिड
अ) फक्त ४ व ५ ब) फक्त ५
क) फक्त २ व ४ ड) फक्त ४

६५. पुढीलपैकी कोणता फुलांचा भाग नाही तो ओळखा?
अ) निदलपुंज म्हणजे फुलाच्या पाकळ्या
ब) पेर व पान यांच्यामध्ये मुकुल असते.
क) दलपुंज म्हणजे फुलाच्या पाकळ्या
ड) निदलपुंज सर्वसाधारण हिरव्या रंगाचे असते.

६६. खालील विधाने लक्षात घेऊन असत्य विधान कोणते ते ओळखा?
१) वितळ तारेचा रोध नेहमी जास्त असतो.
२) वितळ तारेचा द्रवणांक कमी असतो.
३) वितळतार टिन आणि शिसे पासून बनलेली असते.
अ) फक्त १, २ ब) फक्त २
क) फक्त १ आणि ३ ड) एकही नाही.

६७. एक निरिक्षक एका तोफेतून १७० मी अंतरावर उभा आहे. निरीक्षकाने तोफेपासून निघणारा धूर पाहिला व नंतर ०.५ सेकंदाने तोफेचा आवाज ऐकला, तर ध्वनीची हवेतील चाल काढा.
अ) ३७० m/s ब) ३४० m/s
क) ३५० m/s ड) ३६० m/s

६८. योग्य जोडया लावा.
१) आवर्ती बदल i) लाकडाचा कोळसा होणे.
२) परिवर्तनीय बदल ii) भूकंप
३) अपरिवर्तनीय बदल iii) मेण वितळणे
४) अनावर्ती बदल iv) घडयाळ्यातील काटे

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| अ) | iv | iii | i | ii |
| ब) | iii | i | ii | iv |
| क) | iv | ii | i | iii |
| ड) | iii | iv | i | ii |

६९. खालीलपैकी कोणत्या पेशी सूक्ष्मजीवांना गिळंकृत करणाऱ्या आहेत.
१) पांढऱ्या पेशी २) लोहित पेशी
३) चेतापेशी ४) यापैकी नाही.
अ) १ ब) २ क) १, २ ड) २, ३

७०. खालील विधाने विचारात घ्या?
१) बहिर्वक्र भिंगाचे नाभीय नेहमी धन असते.
२) बहिर्वक्र भिंगाद्वारे निर्माण होणाऱ्या प्रतिमा उलट असतात.
वरीलपैकी असत्य नसलेले विधान / विधाने कोणती?
अ) फक्त १, २ ब) फक्त १
क) फक्त २ ड) यापैकी नाही.

७१. शरीराला सर्वात जास्त प्रमाणात कोणते पोषणद्रव्य लागतात.
१) कर्बोदके २) स्निग्ध
३) प्रथिने ४) जीवनसत्त्वे
अ) १, ३, ४ ब) १ व २ क) १, २, ३ ड) फक्त ४

७२. तापमापीमध्ये पारा वापरतात कारण...........
१) पारा काचेला चिकटत नाही व स्पष्ट दिसतो.
२) तापमानात किंचीतही बदल झाला तर पारा चटकन प्रसरण पावतो.
३) पारा सर्वसाधारण तापमान व दाबाला द्रव अवस्थेत असतो.
४) पारा उष्णतेचे व विजेचा दुर्वाहक आहे.
वरीलपैकी योग्य पर्याय निवडा.
अ) फक्त ३, ४ ब) १, २, ४
क) १, २, ३ ड) वरील सर्व

RELIABLE ACADEMY 9222333999

७३. योग्य जोडया लावा.
१) तांबे व जस्त i) स्टेनलेस स्टील
२) लोखंड व निकेल, क्रोमिअम ii) पारद संमिश्र
३) पारा व जस्त iii) ब्राँझ
४) तांबे व कथिल iv) पितळ

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| अ) | iv | iii | i | ii |
| ब) | i | iii | ii | iv |
| क) | iv | i | ii | iii |
| ड) | i | ii | iii | iv |

७४. CGS पद्धतीतील ऊर्जेचे एकक कोणते ते ओळखा?
अ) ज्यूल ब) अर्ग क) वॅट ड) ॲम्पीअर

७५. खालीलपैकी कोणते विधान अयोग्य आहेत ते ओळखा?
१) डॉ. रतन लाल यांना २०१९ च्या जपान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
२) सामग्री आणि उत्पादन क्षेत्रामध्ये डॉ. योशियो ओकामोतो यांना २०१९ चा जपान पुरस्कार प्राप्त झाला.
अ) फक्त १ ब) फक्त २
क) १ आणि २ योग्य ड) १ आणि २ अयोग्य

७६. IMBEX २०१८ – १९ हा संयुक्त भूदल युद्ध सराव खालीलपैकी कोणत्या दोन देशांत पार पडला?
अ) भारत – म्यानमार ब) भारत – व्हिएतनाम
क) भारत – सिंगापूर ड) भारत – मलेशिया

७७. खालीलपैकी कोणता पर्याय योजनाबद्दल अयोग्य आहे ते ओळखा?
अ) पंतप्रधान विद्या लक्ष्मी कार्यक्रम – विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्जाची योजना
ब) स्वच्छ स्वास्थ सर्वत्र योजना - उघडयावर शौचमुक्त गावातील आरोग्य केंद्राचे दृढीकरण करणे.
क) स्वास्थ रक्षा कार्यक्रम - ग्रामीण भागात आरोग्य व आरोग्य शिक्षण या विषयी प्रोत्साहन देणे.
ड) सेतू भारतम योजना - देशात प्रत्येक गाव हगणदारीमुक्त करणे.

७८. १०६ व्या राष्ट्रीय विज्ञान काँग्रेस परिषदचे ३ ते ७ जानेवारी २०१९ या दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. ही परिषद कोणत्या ठिकाणी घेण्यात आली.
अ) जालंधर (पंजाब) ब) भूवनेश्वर (ओडिसा)
क) वाराणसी (उत्तरप्रदेश) ड) मुंबई (महाराष्ट्र)

७९. खालील विधाने विचारात घेऊन कोणते विधाने योग्य आहेत ते ओळखा?
१) केंद्र सरकारद्वारे SEZ धोरणाचा अभ्यास करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे.
२) समितीचे अध्यक्ष बाबा कल्याणी हे आहेत.
३) SEZ धोरण WTO च्या निकषानुसार अद्ययावत केले जाणार आहे.
४) सध्याचे SEZ धोरण – १ एप्रिल २००० पासून लागू आहेत.
अ) १ आणि २ ब) २ आणि ३
क) यापैकी नाही. ड) वरील सर्व

८०. २०१८ चा शांततेचा नोबेल काँगोचे डॉ. डेनिस मुक्वेगे आणि इराकचे नादिया मुराद यांना त्यांच्या कोणत्या महत्त्वपूर्ण योगदानासाठी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला?
अ) दिव्यांगासाठी कार्य
ब) आदिवासींसाठी कार्य
क) लैंगिक हिंसाचारात बळी पडलेल्या महिलांच्या पूनर्वसनासाठी कार्य
ड) पर्यावरण संवर्धन

८१. पुस्तक व लेखक यांच्या योग्य जोडया जुळवा.

| **पुस्तक** | **लेखक** |
|---|---|
| १) बॉर्न अगेन ऑन द माऊंटन | i) संजय मांजरेकर |
| २) ट्रिपल तलाक एक्सामिनिंग फेथ | ii) उषा श्रीनिवास लक्ष्मण |
| ३) टाइमलेस लक्ष्मण | iii) अरुणिमा सिन्हा |
| ४) एम्परफेक्ट | iv) सलमान खुर्शिद |

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| अ) | i | ii | iii | iv |
| ब) | ii | iv | i | iii |
| क) | iii | iv | ii | i |
| ड) | iii | ii | iv | i |

८२. खुल्या प्रवर्गाला आरक्षण देणारे विधेयक केंद्राने मंजुर केल्यानंतर शिक्षण व रोजगारात हे आरक्षण देणारे पहिले राज्य कोणते?
अ) गुजरात ब) महाराष्ट्र क) उत्तर प्रदेश ड) हरियाणा

८३. जगभरात हिंदी भाषेचा प्रसार व्हावा यासाठी १८ ऑगस्ट २०१८ या दिवशी मॉरिशची राजधानी पोर्ट लुईस येथे जागतिक हिंदी संमेलन आयोजित केले गेले. या संमेलनात मॉरिशसचे पंतप्रधान प्रविणकुमार जगन्नाथ यांनी सायबर टॉवरला कोणत्या महान व्यक्तीचे नाव देण्याची घोषणा केली.
अ) सरदार वल्लभभाई पटेल
ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर
क) अटलबिहारी वाजपेयी
ड) नरेंद्र मोदी.

८४. खालीलपैकी नियुक्त्यांबद्दल अयोग्य पर्याय ओळखा.
अ) राष्ट्रीय महिला आयोग अध्यक्ष – डॉ. राजीव कुमार
ब) राष्ट्रीय बाल संरक्षण आयोग अध्यक्ष – प्रियांक कानुनगो
क) ७ वा वेतन आयोग अध्यक्ष - अशोककुमार माथूर
ड) केंद्रीय निवडणूक मुख्य आयुक्त – सुनिल अरोरा

८५. जागतिक आरोग्य संघटनेने नुकत्याच जाहीर केलेल्या 'जागतिक पोषण अहवाल २०१८' नुसार जगातील सर्वाधिक खुंटीत वाढ असलेली बालके कोणत्या देशात आढळतात?
अ) भारत ब) नेपाळ क) चीन ड) जपान

८६. भारतीय अर्थव्यवस्थेवरील कृषीक्षेत्राचे महत्त्व खालील प्रमाणे कोणते नाही ते ओळखा?
१) राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा
२) रोजगार निर्मितीत योगदान
३) परकिय व्यापारात योगदान
४) उद्योगांना कच्च्या मालाचा पुरवठा
अ) फक्त ४ ब) १, २ व ३
क) फक्त ३ ड) यांपैकी नाही.

८७. खालीलपैकी कोणत्या बाबी सापेक्ष दारिद्र्याच्या संदर्भात बरोबर आहे ते ओळखा?
१) दरडोई उत्पन्न व दरडोई उपभोग यावर सुद्धा अशा प्रकारची गरीबी आधारीत असते.
२) सापेक्ष दारिद्र्याचे निर्मुलन होऊ शकते.
३) सापेक्ष गरीबी ही सार्वत्रिक संकल्पना असून ती सर्वत्र आढळते.

RELIABLE ACADEMY 9222333999

४) निरपेक्ष गरीबीचे निर्मुलन होऊ शकत नाही.
अ) केवळ १ व ३ ब) केवळ २ व ४
क) केवळ ३ ड) केवळ १ व २

८८. भारताच्या २०११ च्या जनगणनेसंबंधी योग्य विधान कोणते?
१) २०११ च्या जनगणनेनुसार भारताची साक्षरता प्रमाण ७३% होते.
२) भारताची ग्रामीण साक्षरता ६७.८% होती.
३) २०११ च्या जनगणनेनुसार भारताचे लिंग गुणोत्तर ९४३ होते.
४) २०११ च्या जनगणनेनुसार भारताचे ग्रामीण लिंग गुणोत्तर ९४९ होते. तर शहरी ९२९ होते.
अ) १, २ व ३ ब) १, २ व ४ क) १, ३ व ४ ड) वरील सर्व

८९. योग्य जोडया लावा.
१) मिश्र अर्थव्यवस्था i) ॲडम स्मिथ
२) भांडवलशाही अर्थव्यवस्था ii) कार्ल मार्क्स
३) राज्य अर्थव्यवस्था iii) रॅग्नर वर्क्स
४) दारिद्रयाचे दृष्टचक्र iv) केन्स

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| अ) | i | ii | iv | iii |
| ब) | ii | iv | i | iii |
| क) | iv | i | ii | iii |
| ड) | iii | ii | i | iv |

९०. शहरी बेकारीचे प्रकार सांगा?
१) घर्षणनात्मक बेकरी २) सुशिक्षित बेकारी
३) तांत्रिक बेकारी
अ) केवळ १ व २ ब) केवळ १ व ३
क) केवळ ३ ड) वरील सर्व

९१. राष्ट्रीय उत्पन्नासंदर्भात पुढील पर्यायातून राष्ट्रीय उत्पन्नाचे योग्य ती वैशिष्टये सांगा.
१) राष्ट्रीय उत्पन्न ही संकल्पना समग्रलक्षी आहे.
२) राष्ट्रीय उत्पन्नात निव्वळ विदेशी उत्पन्नाचा समावेश केला जातो.
३) राष्ट्रीय उत्पन्न ही प्रवाही संकल्पना आहे.
४) राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे चलनात व्यक्त केलेले मुल्य होय.
अ) केवळ १ व २ ब) केवळ ४
क) एकही नाही. ड) वरील सर्व

९२. राष्ट्रीय उत्पादन धोरण २०११ याबाबत योग्य विधान कोणते?
१) उत्पादन क्षेत्राचा मध्यावधी वृद्धीदर १२ ते १४% ठेवणे.
२) २०२२ पर्यंत १०० मिनियन जास्तीची रोजगार निर्मिती करणे.
३) २०२२ पर्यंत भारताच्या जीडीपी मध्ये उत्पादन क्षेत्राचा वाटा २५% करणे.
४) पर्यावरण, उर्जाकार्यक्षमता, स्त्रोतांचा योग्य वापर विचारांत घेऊन शाश्वत वाढीवर भर देणे.
अ) १ व ४ ब) १ व २ क) ३ व ४ ड) वरील सर्व

९३. योग्य विधाने सांगा.
१) १९०१ च्या तुलनेत २०११ पर्यंत भारताची लोकसंख्या पाच पटीने वाढली.
२) १९०१ च्या तुलनेत २०११ पर्यंत भारताची लोकसंख्या साडेतीन पटीने वाढली.
३) १९८१ - २०११ या दरम्यान भारताची लोकसंख्या जवळपास ५३ कोटीने वाढली.
अ) केवळ १ ब) केवळ २ क) केवळ ३ ड) वरील सर्व

९४. सर्वाधिक दरडोई उत्पन्न चालु किंमतीनुसार असणारे राज्य कोणते?
अ) गुजरात ब) महाराष्ट्र
क) गोवा ड) तामिळनाडू

९५. योग्य जोडया जुळवा.
१) राष्ट्रीय उत्पन्न समिती i) २००५
२) राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संघटना ii) १९५१
३) केंद्रीय सांख्यिकी आयोग iii) १९४९
४) राष्ट्रीय सांख्यिकी आयोग iv) १९५०

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| अ) | ii | i | iv | iii |
| ब) | iii | iv | ii | i |
| क) | ii | iii | iv | i |
| ड) | i | ii | iii | iv |

९६. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्यातील खालील जिल्ह्याचा कमी ते उच्च साक्षरतेनुसार योग्य क्रम लावा.
१) धुळे २) बीड ३) नंदूरबार ४) यवतमाळ
अ) १, २, ३ व ४ ब) २, १, ४, ३
क) ४, २, १, ३ ड) १, ३, ४, २

९७. ज्या ठिकाणी प्राथमिक, द्वितीयक क्रिया, बँकिंग, शेअर मार्केटिंग व व्यापार इ. क्रिया घडतात त्याला....... म्हणतात.
अ) अर्थव्यवस्था ब) मिश्र अर्थव्यवस्था
क) भांडवलशाही अर्थव्यवस्था ड) राज्य अर्थव्यवस्था

९८. १९९१ मध्ये सार्वजनिक क्षेत्रात खालीलपैकी कोणत्या तीन क्षेत्रांना राखीव ठेवण्यात आले आहे?
१) रेल्वे २) अनुऊर्जा
३) खनिजद्रव्य ४) बँकिंग
अ) केवळ १ व २ ब) १, २ व ४
क) १, २ व ३ ड) १, ३ व ४

९९. योग्य जोडया जुळवा.
१) सिमांत शेतकरी i) १० हेक्टर पेक्षा जास्त
२) मध्यम शेतकरी ii) १ हेक्टर पेक्षा कमी
३) मोठा शेतकरी iii) १ ते २ हेक्टर
४) लघु शेतकरी iv) ४ ते १० हेक्टर

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| अ) | iii | ii | iv | i |
| ब) | ii | iv | i | iii |
| क) | ii | iv | ii | i |
| ड) | i | iv | ii | iii |

१००. आर्थिक विषमतेसंबंधी योग्य विधान कोणते ते ओळखा?
१) भारतातील उत्पन्नाची विषमता अलिकडे कमी होत असल्याचे दिसून येत आहे.
२) भारताचा गिनीगुणांक २०१० - ११ पेक्षा २०११ - १२ मध्ये कमी झाला होता.
३) उत्पन्न व संपत्तीची विषमता शहरी भागात ग्रामीण भागाच्या तुलनेत बरीच अधिक असते.
४) उत्पन्नाच्या विषमतेचे प्रमाण मोजण्यासाठी लॉरेझवक्र व त्यावरुन काढलेला गिनीगुणांक याचा वापर केला जातो.
अ) केवळ १, ३ व ४ ब) केवळ १, २ व ३
क) केवळ १, २ व ४ ड) वरील सर्व

RELIABLE ACADEMY 9222333999

महा TEST SERIES PSI/ STI/ ASO (२०१९)

Kalyan-Nashik-Parbhani संयुक्त पूर्व सराव परिक्षा पेपर Marks: 100

Paper No: 9 Test Series by : Nandini Manohar Patil Time: 1 hr.

**Paper No: 9 (ANS. KEY)**

| प्रश्न क्र. | उत्तर | प्रश्न क्र. | उत्तर | प्रश्न क्र. | उत्तर | प्रश्न क्र. | उत्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ड | २६ | ब | ५१ | ब | ७६ | अ |
| २ | ड | २७ | क | ५२ | ब | ७७ | ड |
| ३ | ड | २८ | अ | ५३ | ब | ७८ | अ |
| ४ | ड | २९ | अ | ५४ | ब | ७९ | ड |
| ५ | ड | ३० | अ | ५५ | ब | ८० | क |
| ६ | क | ३१ | क | ५६ | क | ८१ | क |
| ७ | ब | ३२ | ब | ५७ | ड | ८२ | अ |
| ८ | क | ३३ | क | ५८ | ब | ८३ | क |
| ९ | अ | ३४ | ब | ५९ | ब | ८४ | अ |
| १० | क | ३५ | क | ६० | ब | ८५ | अ |
| ११ | ब | ३६ | क | ६१ | ब | ८६ | ड |
| १२ | क | ३७ | ब | ६२ | ब | ८७ | अ |
| १३ | ब | ३८ | अ | ६३ | क | ८८ | ड |
| १४ | अ | ३९ | ड | ६४ | अ | ८९ | क |
| १५ | क | ४० | क | ६५ | अ | ९० | ड |
| १६ | ब | ४१ | ब | ६६ | ड | ९१ | ड |
| १७ | ब | ४२ | ब | ६७ | ब | ९२ | ड |
| १८ | ड | ४३ | अ | ६८ | अ | ९३ | ड |
| १९ | ड | ४४ | ब | ६९ | अ | ९४ | क |
| २० | ड | ४५ | ब | ७० | अ | ९५ | ब |
| २१ | क | ४६ | अ | ७१ | क | ९६ | ब |
| २२ | क | ४७ | क | ७२ | क | ९७ | अ |
| २३ | ब | ४८ | ब | ७३ | क | ९८ | क |
| २४ | ब | ४९ | अ | ७४ | ब | ९९ | अ |
| २५ | अ | ५० | क | ७५ | क | १०० | ड |

RELIABLE ACADEMY 9222333999